




दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार २२ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २१९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये



प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका,गाव पातळीवर वार्ताहार/पत्रकार/जाहिरातदार प्रतिनिधी नेमणे आहे.

दैनिक वादळ वार्ता

या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

** पात्रता **

१. समाजसेवेची आवड २. जनसंपर्क ३. स्मार्ट फोन असणे आवश्यक ४. सोशल मीडियाचा वापर करता येणे

संपर्क-९४२२६६००७७

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.


# मद्य घोटाळा प्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक



**वादळवार्ता/दिल्ली**

दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांना गुरुवारी रात्री सक्तवसुली संचलनालयाकडून अटक करण्यात आली. आज संध्याकाळी ईडीचे अधिकारी त्यांच्या घरी पोहोचले तेव्हाच त्यांच्यावर कारवाई होणार असल्याची कुणकुण लागली होती. ईडीच्या अधिकाऱ्यांनी अरविंद केजरीवाल यांच्या घरी काहीवेळ तपास केला. त्यानंतर साधारण दोन तासांनी ईडीच्या अधिकाऱ्यांनी अरविंद केजरीवाल यांना अटक केली. दिल्लीतील मद्य घोटाळा प्रकरणात अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली आहे. अरविंद केजरीवाल यांना मद्य घोटाळा प्रकरणात नऊवेळा समन्स बजावण्यात आले होते. मात्र, अरविंद केजरीवाल एकदाही ईडीच्या चौकशीला हजर राहिले नव्हते. अखेर गुरुवारी संध्याकाळी ईडीचे अधिकारी त्यांच्या घरी पोहोचले. सुरुवातीला त्यांची चौकशी होईल, असे सांगण्यात आले होते. मात्र, दोन तासांच्या चौकशीनंतर ईडीने अरविंद केजरीवाल यांना ताब्यात घेतले. ईडीच्या या कारवाईमुळे आम आदमी पक्षाला मोठा धक्का बसला आहे. ईडीच्या कारवाईनंतर आपचे कार्यकर्ते प्रचंड आक्रमक झाले आहेत. कोणत्याही परिस्थितीत अरविंद केजरीवाल हेच दिल्लीचे मुख्यमंत्री राहतील, असे आपकडून सांगण्यात आले. अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली. हे एक राजकीय षडयंत्र आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हेच राहतील. त्यांना तुरुंगात सरकार चालवावे लागले तरी हरकत नाही. मात्र, मुख्यमंत्री केजरीवाल हेच राहतील. ईडीकडून अनेक धाडी टाकण्यात आल्या मात्र, त्यातून एक रुपयाही त्यांना मिळाला नाही. आज लोकसभा निवडणुकांच्या तोंडावर अटक करण्यात आली. हे एक षडयंत्र आहे. अरविंद केजरीवाल माणूस नाहीत, ते एक विचार आहेत, अशी प्रतिक्रिया आपच्या नेत्या आतिशी मारलेना यांनी व्यक्त केली आहे.

## पत्रकार सचिन नाईक यांच्या अपघाती निधन

**वादळवार्ता माजलगाव। प्रतिनिधी**

पत्रकार सचिन अनिल राव n नाईक पोहनेरकर ३८ वर्षे यांचे अपघाताने निधन झाले त्यांच्याबरोबर त्यांचे एक मित्र हे गंभीर जखमी झाले असून त्यांना छत्रपती संभाजीनगर येथे हलवण्यात आले आहे तर सचिन नाईक यांना बीड कडे नेत असताना वाटेतच त्यांचे निधन झाले. याबाबत समजलेली अधिक माहिती अशी पत्रकार सचिन नाईक व त्यांचा मित्र सर्वेश नरेश बजाज वय २१ वर्ष मोटरसायकल वरून कल्याण विशाखापट्टणम या राष्ट्रीय महामार्गावरून काही कामानिमित्त जात होत यावेळी पवारवाडी फाट्याजवळ त्यांची मोटरसायकल स्लिप झाली व जबरदस्त अपघात होऊन सचिन नाईक व सर्वेश बजाज या दोघांचा डोक्याला गंभीर मार लागला त्यांना बीड येथे शासकीय रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले परंतु दुर्दैवाने पत्रकार सचिन नाईक यांनी रस्त्यातच आपले प्राण सोडले तर त्यांचे मित्र सर्वेश बजाज




यांना छत्रपती संभाजी नगर येथे उपचारासाठी पाठवण्यात आले आहे दरम्यान रात्री उशिरा तरी च्या वर शोकाकुल क्षवातावरणात आणि संस्कार करण्यात आले अत्यंत शांत आणि संयमी स्वभावाचे पत्रकार म्हणून परिचित असलेले सचिन नाईक परिसरात ओळखले जात होते त्यांच्या अकाली निधनाने सर्वत्र हळहळ होत आहे विशेष म्हणजे काल माजलगाव येथे निवडणूक आयोगाचे वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली होती त्या पत्रकार परिषदेला उपस्थित होते व सर्वांशी हसतमुखाने हस्तांदोलन करत होते त्यामुळे सर्वांच्या मनात त्यांच्याविषयी हळहळ व्यक्त होत आहे नाईक परिवारावर कोसळलेल्या या दुःखात दैनिक अभिमान परिवार सहभागी आहे ,.

## चिंचोली माळी येथे सातवीच्या विद्यार्थ्याची आत्महत्या !

**दैनिक वादळ वार्ता**

**वादळवार्ता/गौतम बचुटे**

केज तालुक्यातील चिंचोली (माळी) येथे आत्याकडे शिक्षणासाठी राहत असलेल्या एका १४ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या बाबतची माहिती अशी की, सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथील दिपक उर्फ दिप सचिन अकलूजकर याचे वडील कोरोनामध्ये मयत झाले होते. तसेच त्यानंतर आईने देखील दुसरे लग्न केल्याने अनाथ असलेल्या दिपक उर्फ दिप सचिन अकलूजकर याला त्याची आत्या सौ. उषा मोहिते या चिंचोली (माळी) ता. केज येथे शिक्षणासाठी घेऊन आले होते. दिपक उर्फ दिप सचिन हा कर्मवीर विद्यालय चिंचोली माळी येथे ७ वीच्या वर्गात शिक्षण घेत होता. दरम्यान २१ मार्च रोजी सकाळी १०:०० वा. च्या सुमारास दिपक उर्फ दिप सचिन अकलूजकर याने आत्याच्या असलेल्या घरा शेजारी असलेल्या शेळीच्या गोठ्यात नायलॉनच्या दोरीने घराच्या अडूला गळफास



घेऊन आत्महत्या केली. दीपक उर्फ दीप अकलूजकर हा अत्यंत हुशार आणि मनमिळावू वृत्तीचा होता. त्याच्या निधनाने गावात हळहळ व्यक्त होत आहे. या प्रकरणी त्याचे मामा विकास तुकाराम मोहिते यांनी केज पोलीस ठाण्यात दिलेल्या माहिती वरून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलीस जमादार बाबासाहेब बांगर हे पुढील तपास करीत आहेत.

## पवित्र रमज़ान व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त स्वच्छता, विद्युतपुरवठा,पाणीपुरवठा अश्या नागरी सुविधा तात्काळ पुरवा-राजु कुरेशी

**दैनिक वादळ वार्ता**

माजलगाव- मार्च महिन्यापासून मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना सुरु होवुन एप्रिल महिण्यात रमजान ईद तसेच १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी होणार असल्याने शहरात स्वछता,पाणी पुरवठा,विधुत पुरवठा आदी आवश्यक नागरी सुविधा मुबलक प्रमाणात पुरवा अशी मागणी कुरेश कॉन्फरन्स युथविंग बीड जिल्हाध्यक्ष राजु भाई कुरेशी यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे. रमजान च्या पवित्र महिण्यात शहरात दररोज नियमीत साफसफाई करणे तसेच प्रत्येक मस्जीद जवळील साफसफाई करावे तसेच मेन रोड, धारुर रोड,बीड रोड, मौलाना आझाद चौक, शिवाजी महाराज चौक, संभाजी महाराज चौक वरील स्ट्रेट लाईट बंद असुन पहाटे वार्कींग ला (व्यायाम) करणारे व फिरणारे महिला, पुरुष अश्या सामान्य



नागरिकांना ह्याचा खुप त्रास सहन करावा लागत आहे तसेच विद्युत खांबेवरिल लाईट पुर्णपणे बंद असल्यामुळे अंधाराचे फायदा उचलुन चोरांचे प्रमाण वाढत आहे त्यामुळे रोडवरील विद्युत दिवे चालू करावे व शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणात पाण्याचा योग्य नियोजन करुन रमजान माहिन्यात एक दिवस आड नियमीत पणे पाणी पुरवठा सुरळीत करण्यात यावा तसेच प्रत्येक प्रभागात बंद असलेले एलईडी लाईट दुरुस्ती करुन ते चालू करावे ज्या विधुत पोलवर लाईट नाही त्या ठिकाणी नविन एलईडी तात्काळ बसविण्याची व्यवस्था व्हावी,शहरात ज्या ठिकाणी बुध्द विहार आहेत. त्या ठिकाणी सुध्दा नियमीत साफसफाई करणे व शहरातील विविध भागात एलईडी नविन बल्ब बसविणे,नादुरुस्त असल्यास दुरुस्ती करुन पुर्ववत चालु करणे तसेच ईद व अंबेडकर जयंतीच्या दिवशी पहाटे नळाला पाणी पुरवठा करावा,रमजानच्या महिन्यात नागरी सुविधा तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हाधिकारी साहेब यांनी संबंधीत विभागास आदेशीत करावे अशी मागणी कुरेश कॉन्फरन्स युथ विंग बीड जिल्हा अध्यक्ष राजुभाई कुरेशी यांनी केली

## लोकसभा निवडणूक

### केजरीवालांवर अटकेच्या कारवाई नंतर शरद पवारांचा निशाणा



दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ईडीने अटक केली आहे. लोकसभा निवडणुकीआधी आम आदमी पक्षासाठी हा मोठा धक्का आहे. याआधी मुख्यमंत्री केजरीवाल यांना तब्बल नऊ वेळा ईडीकडून समन्स बजावण्यात आलं होतं. आज ईडीचे पथक त्यांच्या घरी पोहोचले आणि काही वेळाने त्यांना अटक करण्यात आली. अरविंद केजरीवाल यांच्या अटकेनंतर देशभरातून केंद्र सरकार आणि भाजपवर विरोधकांनी टीका केली आहे. अशातच राष्ट्रवादीचे प्रमुख शरद पवार यांनीही भाजपवर निशाणा साधला आहे.

### कुणालाही उमेदवारी द्या, पण रणजितसिंह निंबाळकर यांना नको



माढ्यात खासदार रणजितसिंह निंबाळकर यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. पण त्यांच्या उमेदवारीला स्वपक्ष आणि मित्रपक्षातील नेत्यांकडून आक्षेप घेतला जातोय. भाजप नेते धैर्यवर्धन मोहिते पाटील यांनी रणजितसिंह यांना उमेदवारी जाहीर होण्याआधीच आपल्याला उमेदवारी मिळेल, असं जाहीर केलं होतं. पण पक्षाने पुन्हा रणजितसिंह यांना उमेदवारी दिली. त्यामुळे मोहिते पाटील नाराज झाले आहेत. त्यांच्या मनधरणीचे प्रयत्न पक्षाकडून केले जात असतानाच आज रामराजे निंबाळकर यांनी रणजितसिंह यांच्याविरोधात दंड थोपटले आहेत. दुसरं कुणालाही उमेदवारी द्या, पण रणजितसिंह यांना उमेदवारी देऊ नका, अशी भूमिका रामराजे यांनी मांडली आहे.

### रामदास आठवले यांच्या वाहनाला कंटेनरची धडक,



केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या गाडीचा अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे. रामदास आठवले यांच्या वाहनाला कंटेनरने धडक दिली. या अपघातात रामदास आठवले यांच्या गाडीचं मोठं नुकसान झालं आहे. सुदैवाने रामदास आठवले या अपघातातून सुखरुप बचावले आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारची इजा झालेली नाही. अपघातानंतर रामदास आठवले दुसऱ्या वाहनाने मुंबईच्या दिशेला रवाना झाले आहेत. साताऱ्यातील वाईजवळ ही अपघाताची घटना घडली आहे. रामदास आठवले वाईहून मुंबईच्या दिशेला येत होते. या दरम्यान एका कंटेनरने त्यांच्या गाडीला धडक दिली.

## बीड जिल्हयाच्या सीमेवर होणार लेकीचं भव्य स्वागत


### २२ तारखेला पंकजाताई मुंडे मोहटादेवी नारायणगड, गहिनीनाथ गड ,भगवानभक्ती गडावर जाऊन दर्शन

**दैनिक वादळ वार्ता**

**आष्टी (प्रतिनिधी)**

बीड लोकसभेची निवडणूक तोंडावर आहे, ही निवडणूक लढविण्यासाठी भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे ह्या ताकतीने मैदानात ऊतरल्या आहेत त्याअनुंषगाणे २२ मार्चपासून बीड जिल्हा पहायला मिळणार आहे. या दौऱ्या निमित्ताने त्या दर्शनासाठी पाथर्डी येथील श्री मोहटा देवी तर जिल्यातील नारायनगड गहिनीनाथ गड आणि भगवान भक्ती गडावरही जाणार आहेत या दौऱ्यातअनेकांच्या गाठीभेटीही घेणार आहेत. जिल्हयाच्या सीमेवर धामणगांव इथ त्यांचं भव्य स्वागत करण्यात येणार असून त्याची जय्यत तयारी सध्या सुरू आहे. या दौऱ्यात पंकजाताई मुंडे जिल्हयाचं श्रद्धास्थान असलेल्या विविध गडांना भेटी देऊन आशीर्वाद घेणार आहेत. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेससह विविध नेते मंडळींनाही भेटणार आहे पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयाने त्यांचा दौरा जाहिर केला आहे

त्यानुसार पंकजाताई २१ मार्चला अहिल्यानगर येथे असणार आहेत. दुसऱ्या दिवशी २२ तारखेला त्या सकाळी ११.३० वा. श्रीक्षेत्र मोहटा देवीचं (ता. पाथर्डी) दर्शन घेणार आहेत. दुपारी १ वा. त्यांचं बीड जिल्हयाच्या सीमेवर धामणगाव (ता. आष्टी) इथे जिल्ह्याच्या वतीनं भव्य स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर आष्टी इथंही स्वागताची जय्यत तयारी करण्यात आली आहे दुपारी ४.४५ वाजता श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे तर ५.३० वा. सावरगाव घाट येथील भगवान भक्ती गडावर जावून राष्ट्रसंत भगवानबाबांचे त्या दर्शन घेणार आहेत. रात्री आठ वाजता त्यांचं बीडमध्ये आगमन होणार आहे.आहे. तर २३ मार्च रोजी सकाळी नऊ वाजता नारायणगडावर जावून त्या दर्शन घेणार आहेत. त्यानंतर पावणे दहा वाजता बीडमध्ये माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देनार व बारा वाजता गेवराईत माजी आ. बदामराव पंडित यांच्या तर दुपारी एक वाजता आ. लक्ष्मण पवार यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट त्या देणार आहेत. तर २४ मार्च रोजी दुपारी बारा वाजता त्या कौठळी तांडा (ता. परळी) येथे जावून बंजारा समाजबांधवांसोबत होळी साजरी करणार आहेत.



## संपादकीय

### अरे भौ! पाण्याच्या उधळपट्टीला ब्रेक लावा होऽऽऽ..!

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त संत निरंकारी मिशन मार्फत देशभर राबवण्यात येत असलेल्या अमृत परियोजने अंतर्गत रविवार दि.२६ फेब्रुवारी २०२४ रोजी देशभरात सुमारे ११०० पेक्षा अधिक ठिकाणी "स्वच्छ जल स्वच्छ मन" अभियान राबवण्यात आले. या अभियानांतर्गत नदी परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या स्वच्छता मोहीमेत नदीपात्र, पाणवठे व पाणी स्वच्छ करण्यात आले. या मोहीमेत हजारो निरंकारी संत व सेवादलाचे बंधुभगिनी सहभागी झाले होते. स्वच्छ जल आणि जल रक्षणाप्रति समर्पित अशी ही मोहीम आहे. ती दरवर्षी राबविण्यात येत आहे. या लोककल्याणकारी मोहिमेचे व कार्याचे जगभरातून कौतुक होत असते. अशा मोहिमेत सामान्य जनतेनेही सहभाग घेऊन आपला खारीचा वाटा उचलायला काय हरकत आहे? श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर प्रेरणादायी संकलित लेख... संपादक.

उन्हाळा सुरु झाला कि सर्वत्र पाण्याच्या तुटवड्याचे संकेत निर्माण होतात, जगामध्ये आजही पाण्याचे संकट सुरु आहे. असा एकही प्रदेश नसेल जेथे पाण्याची कमतरता भासत नाही. आजही लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळताना वणवण फिरावे लागते. असं तुम्ही कित्येकदा ऐकले असेल, भविष्यामध्ये पाण्यासाठी महायुद्धही होऊ शकते. एवढे सजीवांना पाण्याची आवश्यकता आहे. परंतु, दिवसेंदिवस मानव पाण्याचे महत्त्व विसरत चालला आहे, ज्यामुळे आज पाणी टंचाईच्या संकटाला जग सामोरे जात आहे. प्रत्येकाच्या जीवनातील पाण्याचे महत्त्व समजावून सांगण्यासाठीच जागतिक पेय जल दिन साजरा करायला सुरूवात झाली म्हणायला हरकत नाही. संयुक्त राष्ट्राचे सदस्य असलेल्या देशांकडून दरवर्षी हा दिवस आवर्जून साजरा केला जातो. तसेच दरवर्षी एक नवी संकल्पनाही या दिवसासाठी मांडली जाते. वर्षभर या संकल्पनेस अनुसरून विविध उपक्रम राबवले जातात. यावर्षीची जागतिक जल दिनाची थीम वेल्यूइंग वाटर ही आहे. दि.२२ मार्च १९९२ रोजी प्रथम जागतिक जल दिन साजरा केला गेला. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण आणि विकासाच्या परिषदेत हा दिवस साजरा करण्याचा निर्णय ब्राझील मधील रिओ दि जानेरो येथे घेण्यात आला. संयुक्त राष्ट्रसंघाने सन १९९३ साली महासभेत हा दिवस वार्षिक कार्यक्रम म्हणून साजरा करण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केला.

पृथ्वीवर ७० टक्क्यांहून अधिक प्रमाण पाण्याचे आहे. पण सरासरी पाहता गोड्या पाण्याचे- पेय जलाचे प्रमाण क्षारयुक्त पाण्यापेक्षा खूपच कमी आहे. क्षारयुक्त पाण्याची टक्केवारी ही ९७.३ इतकी आहे, परंतु हे पाणी पिण्यास योग्य नाही. मुंबईसारख्या मेट्रो शहरांमध्ये दररोज गाड्या धुण्यासाठी लागणाऱ्या पाण्यावर साधारण ५० लाख लिटर पाणी खर्च होते. त्याचप्रमाणे मुंबई, दिल्ली, आणि चेन्नईसारख्या शहरांमध्ये पाईपलाईन दुरुस्ती करताना अवस्था खराब झाल्यामुळे ४० टक्क्यांपर्यंत पाण्याचा अपव्यय होतो. काही ठिकाणी पाणी टंचाईमुळे पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना वणवण फिरावे लागते. घरी सकाळी ब्रश करताना नळा चालू ठेवला असता पाच मिनिटांमध्ये अनेक लिटर पाणी सहज वाया जाते. शरीर निरोगी राहण्यासाठी प्रत्येक व्यक्तीस दररोज पिण्यासाठी ३ लिटर पाण्याची आणि तसेच जनावरांसाठी साधारण ५० लिटर पाण्याची आवश्यकता भासते. एक किलो गहू पिकवण्यासाठी एक हजार लिटर तर एक किलो तांदूळ उगवण्यासाठी चार हजार लिटर पाण्याची आवश्यकता भासते. अशाप्रकारे विविध गोष्टींद्वारे आपल्याला जीवनामध्ये पाण्याचे अत्यंत महत्त्व आहे. पाण्यासंदर्भात अशा अनेक गोष्टी आहेत, ज्याची कल्पना कदाचित आपल्याला नसेलही.

# मानवा, तुला जंगलाचा काय उपयोग?

आपल्या दृष्टीआड असलेल्या सृष्टीचे महत्त्व मानवाला न समजण्याचे हे अगदी स्पष्ट उदाहरण म्हणता येईल. शुध्द हवा, पिण्याचे पाणी आणि इतरही अनेक बाबी आपल्याला मिळतात, ते या वनांमुळेच! मात्र चंगळवादी जीवनशैलीसाठी केल्या जाणाऱ्या बेसुमार जंगल तोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळत चालला आहे, हे सन १९७०च्या दशकापासूनच जाणवू लागले. त्यातून जंगले वाचवण्याची संकल्पना पुढे आली. संयुक्त संघाच्या अन्न व शेती संघटनेच्या सदस्य देशांनी हा वर्ल्ड फॉरेस्ट डे- आंतरराष्ट्रीय वन दिन दि.२१ मार्च २०१२पासून साजरा करण्यास सुरुवात केली. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांच्या लेखणीतून वनमहात्म्य विशद... संपादक.

आपण "दृष्टीआड सृष्टी!" असे नेहमीच ऐकत असतो. पण या सृष्टीच्या आड असे काय आहे? जे आपल्याला दृश्य नाही, दिसत नाही. अशा कितीतरी गोष्टी या सृष्टीची चक्रे फिरवत असतात. यामध्ये दगड, माती, हवा, पाणी असे निर्जीव घटक आहेत. त्याचप्रमाणे झाडे-किडे, माणूस-प्राणी, साप-मासे असे विविध सजीवही आहेत. या सर्वांच्या अनुकूल-प्रतिकूल ससंबंधाने शतकानुशतके पृथ्वीचा इतिहास लिहीला जात आहे. या सर्व सजीव-निर्जीव गोष्टींचा प्रभाव एकमेकांवर पडत असतो. त्याचप्रमाणे यांच्या पूरक वापराने एकूणच जीवसृष्टीचे संवर्धनही होत असते. माणूस हा निसर्गाचा वैरी नसून त्याच्याच मदतीने निसर्गाचे जतन व संवर्धन होऊ शकते. जंगलांतून मिळणाऱ्या संसाधनांचा मनुष्याच्या उपजीविकेशी थेट संबंध आहे. इ.स.२००२ साली जंगल संवर्धनासाठी जैवविविधता कायदा मंजूर झाला. सामुहिक वनहक्क कायदा आला. कारण शासनच मोठाली झाडे तोडून उत्पन्न लाभ घेत असे आणि शेतकरी व सामान्य जनतेला वेठीस धरत असे, अटकाव करत असे. म्हणून शेतकरी व आदिवासी बांधवांनी याविरुद्ध दंड थोपटून आवाज उठविला. आदिवासी बांधवांनी तर "नावा नाटे; मावा राज!" म्हणत संघर्ष केला. त्यामुळेच त्यांचे व इतर परंपरेने राहणाऱ्या आणि जंगलांचे संवर्धन करणाऱ्या वननिवासी यांच्या जंगलावरील हक्कांना मंजूरी देण्यात आली. याच कायद्यांचा व इतर शासकीय योजनांचा आधार घेत गावांमध्ये बदल घडू लागले आहेत. याची काही उदाहरणे-

आदिवासी भागात सामुहिक वनहक्क मिळालेला गडचिरोली जिल्हा म्हणून नाव ऐकले असालच. येथील एकूण १०२५ गावांनी जैवविविधता समित्या स्थापन केल्या. त्यात मोठ्या प्रमाणात जंगल संवर्धनाला सुरुवात केली आहे. यातूनच लोकांच्या उपजीविकेचा प्रश्नही सुटत आहे. सन २००५ला आलेल्या या कायद्यानुसार जंगलांतील बांबू, तेंदूपत्ता या सर्वांचे मालकी हक्क ग्रामसभेला मिळाले. बांबूसारख्या वनोपजाची व्यवस्था लोकांनीच केली. यातून बांबूकटाई साठीची मजुरी आधीपेक्षा तिप्पट प्रमाणात लोकांना मिळू लागली, शिवाय या बांबूविक्रीतून गावासाठी आवश्यक विकासकामांस लोकांना पैसे मिळाले. कोरची तालुक्यात सालेम, झेंडेपार, अरवीटोला, अंधेरी, टेंभली, काळेगाव तर धानोरा तालुक्यातील लेखा- मेंढा या गावातील लोकांनी सात एकरात नवीन बांबूची लागवड केली आहे. जे जंगल त्यांना जगवते, त्या जंगलाला ते जगवत आहेत, वाढवत आहेत.

धुळे जिल्ह्यातील बारीपाडा या गावात काही वर्षांपूर्वी वनव्यवस्थापन समिती स्थापन झाली. उजाडलेल्या जंगलाचे संवर्धन झाले. त्यांत चराईबंदी, कुऱ्हाडबंदी वगैरे करण्याचे लोकांनीच ठरविले. वनांतील सर्व झाडांची मोजणी झाली. मोह या उत्पन्न मिळवून देणाऱ्या झाडांचा लिलाव होऊ लागला, ते उत्पन्न गावातील लोकच घेऊ लागले. त्यातून गावात विकासकामे झाली. जंगल वाढीसह भूगर्भातील पाण्याची पातळीही वाढली. उत्तम शेती होऊ लागली; गाव समृद्ध बनत गेले. आणखी उदाहरण धुळे जिल्ह्यातीलच लामकानी गावाचे आहे. शहरात राहणाऱ्या डॉक्टर धनंजय नेवाडकर यांना झालेल्या अपघातामुळे ते काही महिने सक्तीची विश्रांती घेण्यासाठी गावी आले. त्यावेळी लोकांपुढे गुरांचा चारा दुर्मिळ आणि विहिरीचे पाणी आटण्याची मोठी समस्या आहे, असे त्यांच्या लक्षात आले. गावाच्या बाजूलाच सातपुड्याची पर्वतरांग आहे. साधारण एक हजार एकरांचा हा डोंगर सुजलाम-सुफलाम करण्याचे त्यांनी ठरविले. त्यासाठी रोजगार हमी योजनेचा आधार घेतला. पाणी अडवा; पाणी जिरवा, ही कामे तेथे सुरु केली. गावातील लोकांना रोजगार हमी योजनेचा फायदा व रोजगार मिळाला. त्यातून गावातील गुरांच्या चाऱ्याची व पाण्याची समस्या मिटली, का? तर डोंगर पुन्हा समृद्ध बनला आहे.

कोरोना काळातील मागील तीन वर्षांपासून वन्यपशुंचा मानवी वस्त्यांवर हल्ला होत आहे. जनतेचा नाहक बळी जाऊन त्यांची शिकार ठरत आहे, मात्र वन प्रशासन अजूनही कुंभकर्णी झोपेत आहे. वेळीच बंदोबस्त झाला नसल्याने जनता वन प्रशासनास सहकार्य न करण्याच्या पावित्र्यात उभी ठाकली आहे. त्यामुळे शासनाला जबर नुकसानीचा फटका बसू शकतो. म्हणून सकारात्मक पाऊल उचलण्यासाठी व जंगलाचे महत्त्व सर्वांना पटावे म्हणून शासन आणि विविध संस्था यांनी तत्सम नानाविध कार्यक्रम राबवावेत- अनावश्यक जंगलतोड टाळणे, अधिक झाडे लावणे, मनुष्य वस्त्यातील वन्यपशुंच्या हल्ल्यात जीवितहानी होऊ नये, यासाठी प्रशासनाने दक्ष राहणे, जंगलांपासून मिळणारी उत्पादने आणि होणारे फायदे जाणणे इत्यादी जंगलांना सतत भेट देवून माहिती मिळविणे, आदींचा समावेश असतो. जंगलांबाबत आस्था आणि जंगलतोडीमुळे होणाऱ्या हवामानातील बदलांबद्दल काहींना चिंता वाटते. अशा सर्वांना जागतिक पातळीवर व्यासपीठ मिळावे, हा देखील वनदिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. बदलत्या हवामानावर भविष्यात उपाययोजना करताना आणि धोरण आखताना जंगलांबाबत योग्य विचार होत असल्याची खात्री या मंचावरून एकत्रितपणे करता येईल. जसे वनांवरील हक्क लोकांना मिळत आहे, तसेच जंगल संवर्धन आणि जतन करण्याची जबाबदारीही लोकांकडे आहे. ज्या भागांत वनव्यवस्थापन समिती नाही किंवा नुसतीच कागदोपत्री आहे, अशा काही गावांतून लोकांना पर्यटनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे, मात्र बेजबाबदारपणामुळे त्यावर नियंत्रण नाही. यातून जंगलांचा विनाशच जास्त होत आहे व नको त्या वाईट प्रवृत्ती बोकाळत आहेत. यासाठी संतुलित, शाश्वत, जबाबदार लोकसहभागातून होणाऱ्या वन व्यवस्थापनातूनच शाश्वत उपजीविका निर्माण होईल. सोबतच सर्वांनाच शुद्ध हवा आणि शुद्ध आरोग्य अनुभवता येईल, यात यत्किंचितही शंका नाही! !! आंतरराष्ट्रीय वनदिन सप्ताहाच्या समस्त मानवमात्रांस हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त व्हॉ. नं. ९४२३७१४८८३.**

# मोदींना एवढा अहंकार की, रामाऐवजी स्वत:ची मूर्ती:; काँग्रेसच्या महिला नेत्याचा जोरदार हल्लाबोल

काँग्रेस नेत्या प्रणिती शिंदे यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. या वर्षीची निवडणूक आपल्या सगळ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाची निवडणूक आहे. ही निवडणूक करो या मरो अशी ठरणार आहे. या निवडणुकीत आपण योग्य मतदान नाही केले तर लोकशाही संपेल. तर संविधान संपेल शेतकऱ्यांचा आवाज दाबला जाईल आणि निवडणुका ही संपवतील. आपल्याला जो मतदानाचा हक्क आहे तो देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी खेचून घेतील, असं म्हणत प्रणिती शिंदे यांनी हल्लाबोल केला आहे.भाजपवर हल्लाबोलप्रभू श्रीराम सगळ्यांसाठी महत्त्वाचे आहेत. परंतु रामासोबत काम देखील महत्त्वाचं आहे. धर्मासोबत कर्म देखील महत्त्वाचा आहे. मोदींना एवढा अहंकार आहे की, प्रभू श्रीरामांच्या ऐवजी स्वतःची मूर्ती देखील लावायला ते तयार होतील, असा घणाघात प्रणिती यांनी केला आहे. भाजपवाल्यांना लोकशाही संपवायची आहे. जनावरांचे पाणी हिसकावून घेतले. लोकांच्या तोंडातला घास काढून घेतलाय. महागाई वाढली आहे. बेरोजगारी वाढली आहे. पत्रकारांवर हुकूमशाही, कोर्टावर हुकूमशाही... ये देशात काय सुरु आहे?, असा सवाल प्रणिती यांनी विचारला आहे.



**मला भीती नाही- प्रणिती**

मागच्या दहा वर्षात जी तुमची फसवणूक केली तीही पुढे करणार त्यांचे आमदार खासदार ही खोटारडे आहेत. दहा वर्षात भाजपने विश्वासघात केलाय माझ्याकडे काही कारखाने सोसायटी नाहीत त्यामुळे मी ईडीला घाबरत नाही. भाजपच्या मंत्र्यांच्या विरोधात जर कोणी बोललं तर त्यांना अलगद बाजूला काढले जाते पण मला कसली भीती नाही. मी कायम लोकांसाठी लढत राहणार, असा निर्धार प्रणिती शिंदेंनी बोलून दाखवला.प्रणिती शिंदेंचा हल्लाबोल गेल्या 70 वर्षात जात-पात धर्म कधी मानला नाही. म्हणून देश पुढे गेला परंतु भाजपची लोक धार्मिक आधारावर मतदान करायला भाग पाडत आहेत. काम न करता फक्त धार्मिक आधारावर मतदान करायला प्रवृत्त करत असतील तर लोकशाहीला धोका निर्माण होतोय. आपल्या देशाला कीड लावायचा प्रयत्न ही लोकं करतायेत, असंही त्या म्हणाल्या.

# येडेश्वरी साखर कारखान्याचा गाळप हंगाम २३ मार्चला होणार बंद

**वादळवार्ता/केज**
येडेश्वरी साखर कारखान्याचा चालू गाळप हंगाम २०२३-२४ साठी कारखान्याकडे विक्रमी ऊस लागवडीची नोंद झाली होती. अत्यंत शिस्तबध्द व काटेकोरपणे ऊस तोडणी प्रोग्राम राबविल्यामुळे सभासद, बिगर सभासदांच्या सर्व उसाचे गाळप जवळपास पूर्ण होत आले आहेत. कारखान्याचा चालू गाळप हंगाम दि. २३ मार्च २०२३ रोजी बंद होणार आहे, अशी माहिती कारखाना प्रशासनाने दिली आहे. ज्या सभासद आणि बिगर सभासदांचा चालू गळित हंगाम २०२३- २०२४ साठी कारखान्याकडे नोंदविलेला, करार केलेला गाळप पात्र ऊस गाळपाअभावी शिल्लक राहिलेला असेल, अशा सर्व ऊस ऊत्पादकांनी आपल्या ऊस गाळपाच्या कार्यवाहीसाठी त्वरीत कारखान्याच्या शेतकी विभागाशी संपर्क साधून आपला ऊस दि. २३ मार्च २०२३ पूर्वी गाळपास पाठवावा. तसेच



ज्या सभासद, बिगर सभासदांच्या ऊसाची नापीक, रस्ता अडचण अथवा इतर कारणामुळे तोड होऊ शकलेली नाही, अशा सभासद, बिगर सभासद ऊस उत्पादकांनी आपल्या ऊसाची स्वतः तोड व वाहतूक करून सदरचा ऊस कारखाना बंद होण्यापूर्वी कारखान्याकडे गळितास पाठवून द्यावा. ऊस गाळपा अभावी शिल्लक राहिल्यास, अशा शिल्लक ऊसाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी कारखान्यावर राहणार नाही व त्यांना या संदर्भात नुकसान भरपाई मागणेचा हक्क राहणार नाही, याची सर्व ऊस उत्पादकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन कारखाना प्रशासनाने केले आहे.

# मोदींना औरंगजेबाची उपमा देणं हा देशद्रोह, एकनाथ शिंदे

**वादळवार्ता/मुंबई**
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसोबत महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीत लोकसभा निवडणुकीसाठी काय-काय कामं करायची, याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना आवाहन केलं. या बैठकीनंतर एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी बैठकीत नेमकी काय-काय चर्चा झाली, या विषयी थोडक्यात माहिती दिली. तसेच त्यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिलं. संजय राऊतांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची औरंगजेबाशी तुलना केली होती. याच टीकेवरुन एकनाथ शिंदे यांनी राऊतांवर निशाणा साधला.



“लोकसभेच्या निवडणुका जाहीर झालेल्या आहेत आणि त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातून 45 पेक्षा जास्तीच्या जागा महायुतीच्या आल्या पाहिजेत यासाठी प्रत्येक मतदारसंघात शिवसैनिक, पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना अतिशय सक्षमपणे काम केलं पाहिजे. याबाबत आढावा बैठक, मतदारसंघाच्या समस्या सोडवल्या पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा निवडून यायला पाहिजे यासाठी काम करण्याचं आवाहन करण्यात आलं. या बैठकीसाठी प्रत्येक मतदारसंघातील पदाधिकारी, आमदार, खासदार, जिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख यांच्यासोबत चर्चा झाली”, अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी दिली.

# लोकशाहीच्या उत्सवामध्ये सर्वांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे

## केज येथे उपजिल्हा अधिकारी दिपक वजाळे यांची पत्रकार परिषद

वादळवार्ता/केज
केज तहसिल कार्यालयामध्ये आदर्श आचारसंहितेच्या तसेच पाणी/चारा टचाईच्या अनुषंगाने उपजिल्हा अधिकारी दीपक वजाळे , केज तहसीलदार अभिजीत जगताप,अंबाजोगाई तहसीलदार विलास तरंगे यांनी पत्रकार परिषद घेतली. याबाबत सविस्तर वृत्त असे की १७ लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे आदर्श आचार संहिता लागू झाली आहे.त्याबरोबरच पाणीटंचाई व चाराचा टंचाई या अनुषंगाने केज येथे दि. २० मार्च सायं. ५ .३० वाजता उप जिल्हाधिकारी दीपक वजाळे , केज तहसीलदार अभिजीत जगताप,अंबाजोगाई तहसीलदार विलास तरंगे यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यामध्ये त्यांनी लोकशाहीच्या उत्सवामध्ये सर्वांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे तसेच लोकसभा निवडणुकीचे सर्व कामकाज पूर्ण झाले असुन मतदान केंद्रावर ४० सेक्टर्स ऑफीसर्स देखरेख करणार आहेत खर्चावर नियंत्रण करण्यासाठी वेगवेगळ्या टिम तयार करण्यात आल्या आहेत . चेक पोस्टींग , तक्रारीच्या अनुशंगाने ९ टिम कार्यान्वीत करण्यात आल्या आहेत त्यावर तहसिल कार्यालयामधुन एक अधिकाऱ्यांची टिम नियंत्रण करणार आहे जर या प्रक्रिया मध्ये आनखी मनुष्य बळ लागले तर ते पुरवण्यात येणार आहे. यामध्ये २ हजार पेक्षा जास्त कर्मचारी काम करणार आहेत तसेच आम्ही ३ हजार ५०० कर्मचाऱ्यांची निवडणुक विभागाकडे माहिती पाठवली आहे त्या सर्वांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे . निवडणुकी करिता स्ट्रॉग रूम तहसिल कार्यालय केज येथे तयार केलेली आहे. लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने संपूर्ण आराखडा तयार करण्यात आलेला आहे. त्या बरोबरच १८ हाजारापेक्षा जास्त कोनशीला, बॅनर, पोस्टर ,काढण्यात आले आहेत . यावेळी मतदारानां देखील आवाहन करण्यात आले .ज्या मतदारांचे नावे राहिलेली आहेत त्यांची नावे नामनिर्देशन करण्याच्या अगोदर नावाची खात्री करून घ्यावी जर नाव नसेल तर ऑनलाईन प्रक्रिया करून समाविष्ट करण्यात येईल तसेच निवडणुक विभाग प्रत्येक गोष्टीसाठी तयार आहे असेही त्यांनी सांगितले. त्याबरोबरच जिल्हाधिकारी यांच्या सुचनेनुसार तालुक्यात चाराबंदी केलेली आहे . तलावातून पाण्याचा अनाधिकृत उपसा केला जाणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. पाण्याची संमस्या सोडविण्यात येईल तसेच तालुका पातळीवर तहसिलदार व बीडीओ प्रत्येक गावांना भेट देत आहेत . सध्या चारा उपलब्धत आहे मात्र लोकांनी त्याला विकु नये . केज तालुक्यात धनेगाव सह इतर लघु प्रकल्पातील स्थानिक लोकांनी, शेतकऱ्यांनी अनाधिकृत पाणी उपसा करू नये . असेही यावेळी अवाहन करण्यात आले.



# मांजरा धरणातून अवैध पाणी उपसा करणाऱ्यावर केजचे कर्तव्यदक्ष तहसिलदार अभिजीत जगताप यांची धडक कारवाई

## यापुढे अवैध पाणी उपसा सुरु असल्याचे आढळून आल्यास संबंधीतावर गुन्हा नोंद करुन प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येईल.

**दैनिक वादळवार्ता/केज**
मा. जिल्हाधिकारी, बीड यांचे आदेश दिनांक १४.०८.२०२३ नुसार बीड जिल्हयातील जलसंपत्तीचा अवैध उपसा होऊ नये तसेच जिल्हयाचा अवर्षणाचा पूर्व इतिहास पाहता तसेच अल- निनो समुद्र प्रवाह सक्रियता यामुळे चालू वर्षी संभाव्यतः दुर्देवाने पर्जन्याने ओढ दिल्याने उपलब्ध पाणी साठा जास्तीत जास्त कालावधीसाठी पिण्यासाठी वापरता येईल. यासाठी जतन होणे आवश्यक आहे. करिता, जिल्हयातील सर्व पाटबंधारे प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी पुढील आदेशापर्यत आरक्षीत करणेत आले आहे. बीड जिल्हयात सरासरी पेक्षा कमी पर्जन्यमान झालेले असल्याने, पाणी पातळी खालावली आहे हा पाणीसाठा सप्टेंबर २०२४ पर्यत योग्यरित्या संरक्षीत करणे गरजेचे आहे. उपलब्ध लघु व मध्यम प्रकल्पातील पाण्याचा अवैध उपसा जर थांबवला नाही तर भीषण पाणी टंचाई उद्भवू शकते. मा. अपर जिल्हाधिकारी, बीड यांनी आज दिनांक २१/०३/२०२४ रोजी केज तालुक्यास भेट देऊन मा. जिल्हाधिकारी, बीड यांचे आदेशान्वये केज तालुक्यातील सर्व पाटबंधारे प्रकल्पातील / तलावामधील पाणी पिण्यासाठी व जनावरांसाठी पुढील आदेशापर्यत आरक्षीत केले असल्याचे सांगितले. तसेच आज मांजरा धरणातून अवैध पाणी उपसा करणाऱ्यावर कारवाई करत २ मोटारी,



८ स्टार्टर व १० वायर बंडल जप्त करुन तहसील कार्यालयात ठेवण्यात आले आहे. तसेच मांजरा प्रकल्प अधिकारी, पाटबंधारे विभाग, मराविविकं यांना पाणी जतन करण्याविषयी सक्त सूचना देण्यात आल्या. यापुढे अवैध



पाणी उपसा सुरु असल्याचे आढळून आल्यास संबंधीतावर गुन्हा नोंद करुन प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच बीड जिल्हयात भविष्यामध्ये पशुधनासाठी चाऱ्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मा. जिल्हाधिकारी, बीड यांनी सर्व प्रकारचा वाळलेला व ओला चारा बीड जिल्हयाबाहेर वाहतूक करण्यास पुढील आदेशापर्यत सक्त मनाई आदेश पारीत केला आहे. त्याअनुषंगाने वरील पाणी टंचाई व चारा टंचाई या संदर्भात नागरीकांनी सजग व संवेदनशील राहवे असे आवाहन मा. उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई तसेच केजचे तहसिलदार अभिजीत जगताप यांनी केले आहे.

# माळेगाव ते लोखंडी सावरगाव रस्ता बनला मृत्यूचा सापळा

**दैनिक वादळवार्ता केज/परवेज पटेल**
केज तालुक्यातील माळेगाव ते लोखंडी सावरगाव रस्ता मृत्यूचा सापळा बनला आसून रोज एक अपघात होत आहे. त्यात रोडवर मळी व केमिकल युक्त पाण्याचा सडा हा मृत्यूचा सापळा बनला आहे. साइट पट्टीत मुरुम भरला नसल्याने व रोडवर मळी पडल्यावर मोटारसायकल यावरून निसटते स्लीप होउन अपघाचे प्रमाणात वाढ झाली आहे. प्रतिदिन एक-दोन मोटारसायकल घसरत आहेत. पाथरा येथील दोन दुचाकीस्वार पडले, रस्त्यावर पडलेल्या मळी मुळे सतत अपघात होत आहेत. कधी कधी चार-चाकी चे सुद्धा नियंत्रण सुटत आहे. मळीचा रंग हा शेणासी मीळता जुळता असल्याने शेण समजून वाहन वर जाते व स्लीप होउन अपघाचे प्रमाणात वाढ झाली आहे. ट्रॅक्टर धारक प्रमाणा पेक्षा अधिक व डबल ट्राली ट्रॅक्टर ने मळी वाहतुक करतात व बाजुला पत्रे अर्थ वट बांधून मळी वाहतुक करतात व यातुन मळी मोठ्या प्रमाणात गळती होऊन अपघात होऊ लागले आहेत. मळीचा फायदा शेतीला मोठ्या प्रमाणात होत असला तरी मोटारसायकल धारकांना मोठ्या प्रमाणात धोकादायक ठरत आहे. मळी हे शेतकऱ्यांना शेतीसाठी वरदान तर मोटारसायकल धारकांना मृत्यूच कारण बनत आहे, तर कारखान्यातुन निघनारे मोलायसीस पाणी ही रस्त्यावर गळती झाल्याने मोटारसायकल अपघात होत आहेत



# नफरवाडी शाळेचा आणखी एक मानाचा तुरा

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात शाळेचा पाटोदा तालुक्यात द्वितीय क्रमांक

**वादळवार्ता/पाटोदा**
तालुक्यातील नफरवाडी जिल्हा परिषद शाळेला मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळाला असून शाळेचे सर्व पदाधिकारी शिक्षक व मुलांचे सर्व स्तरातून कौतुक अभिनंदन होत आहे

पाटोदा शहरापासून अवघ्या ४ कि.मी.अंतरावर असलेली नफरवाडी शाळा पाटोदा तालुक्यातून मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर या उपक्रमात द्वितीय क्रमांकाची मानकरी ठरल्यामुळे सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे. गुणवत्तेची कास धरत या शाळेने मागील काही वर्षांपासून शाळेला गुणवत्तेत पुढे आणले आहे.मुख्याध्यापक, शिक्षक यांनी मेहनत घेत शाळेचा गुणात्मक दर्जा ठेवण्यात आला आहे .लोकसहभाग,माजी विद्यार्थ्यांचा सहभाग,शाळा व्यवस्थापन समिती सहभाग,गावचे सरपंच,उपसरपंच तसेच त्यांचे सर्व सहकारी,पालक ग्रामस्थ यांचा सहभाग त्याचबरोबर गटशिक्षणाधिकारी आदरणीय पिकवणे साहेब,जेष्ठ शिक्षण विस्तारअधिकारी बोंदार्डे साहेब,गव्हाणे साहेब,शिंदे साहेब,सुळे साहेब,कें. मुख्याध्यापक येवले सर यांचे वेळोवेळी लाभलेले मार्गदर्शन आणि नफरवाडी शाळेचे मुख्याध्यापक तथा पारगाव केंद्राचे केंद्रप्रमुख खंडागळे सर,मुरूमकर सर,काकडे मॅडम,वावरे मॅडम,अडाले सर,वाघमारे मॅडम,सर्व विद्यार्थी यांच्या सामूहिक प्रयत्नांचे हे यश आहे

या उपक्रमाची अंमलबजावणी करताना विद्यार्थी बचत बँक निर्मितीतून विद्यार्थ्यांना बचतीची सवय,परसबाग निर्मितीतून श्रमप्रतिष्ठा,एका राज्याचा अभ्यास करताना राष्ट्रीय एकात्मता,संस्कृतीची ओळख,मेरी माटी मेरा देश या मधून राष्ट्रभावना,महावाचन चळवळ या मधून विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची सवय,विविध सहशालेय स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव,तज्ञ व्यक्तीचे आरोग्य मार्गदर्शनातून निरोगी जीवन, दत्तक वृक्ष उपक्रमातून वृक्ष संवर्धन, स्वच्छता मॉनिटर मधून आरोग्याबरोबरच सामाजिक बांधिलकी,व्यावसायिकांच्या भेटीमधून स्वयंरोजगार कौशल्य विषयक शिक्षण, शालेय मंत्रिमंडळातून भारतीय लोकशाहीची ओळख,उपस्थिती ध्वज या उपक्रमातून वक्तशीरपणा व शिस्त,क्रीडा स्पर्धेमधून शारीरिक विकसन, किशोरवयीन मुलींना मार्गदर्शनातून ग्रामीण भागातील गैरसमज दूर करणे,अशा कितीतरी मूल्यांची रुजवणूक विद्यार्थ्यांमध्ये झाली. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हा उपक्रम म्हणजे शाळेतील औपचारिक शिक्षणाच्या चाकोरीतून बाहेर जाऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणारा हा उपक्रम होय.यामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडण होईल,आणि व्यक्तिमत्वाची घडण झालेले विद्यार्थी उद्या राष्ट्र उभारणीमध्ये मोलाचे योगदान देतील थोडक्यात विद्यार्थी घडणीतून राष्ट्र घडण

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी साठी गावच्या सरपंच सौ. विद्याताई सवासे,उपसरपंच सौ.शितलताई तांबे,सर्व ग्रामपंचायत सदस्य,माजी सरपंच त्यांचे सर्व सहकारी,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रभाकर मंडलिक व सर्व सदस्य,शाळेसाठी वस्तूरूपाने तसेच आर्थिकरूपाने मदत करणारे सर्व पालक ग्रामस्थ तसेच शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी, विकासासाठी मार्गदर्शन करणारे पाटोदा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी पिकवणे साहेब जेष्ठ शिक्षणविस्तार अधिकारी बोंदार्डे साहेब यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शाळेच्या या यशाबद्दल तालुकाभरातून कौतुक केले जात आहे.

दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक

वादळ वार्ता

## वस्ती वाडी येथे पण पिण्याच्या पाण्याची परवड

वादळवार्ता/केज केज तालुक्यातील जीवाचीवाडी अंतर्गत हनुमान वस्ती येथे पण पिण्याच्या पाण्यासाठी करावी लागत आहे भटकंती आज दि.२१-मार्च -२०२४ रोजी हनुमान वस्ती जिवाचीवाडी येथे मंडळ अधिकारी विडा,सुहास



डोरले व तलाठी सज्जा जीवाचीवाडी,उत्तरेश्वर घुले यांनी प्रत्यक्ष माननीय तहसीलदार साहेब यांच्या आदेशान्वये पाणीटंचाई संदर्भात पाहणी करण्यात आली ,अवघा केज तालुका तहानला म्हणावयास हरकत नाही.मानवा बरोबरच मुक्या जनावरांना देखील याची झळ बसत आहे व याचा परिणाम दुध व्यवसायावर होत आहे. यावेळी अगदी वस्ती वाडी येथे पण पिण्याच्या पाण्यासाठी तहानलेले ग्रामस्थ पहावयास मिळाले.

# राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये चांगुलपणाचा आविष्कार विकसित होतो

## प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे तरुणांनी सत्यतेची कास धरावी डॉ.बाबासाहेब ठोंबरे

वादळवार्ता/लातूर

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि महविद्यालय लातूर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचा प्रारंभ मौजे महापूर ता. जि.लातूर येथे दि:२० मार्च २०२४ रोजी भव्य उद्घाटन कार्यक्रमाने झाला. या उद्घाटन कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून कृषि महाविद्यालय, लातूरचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे, उद्घाटक म्हणून ख्यातनाम इतिहास अभ्यासक प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, पदव्युत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन संस्था, चाकूरचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.रणजित चव्हाण,डॉ दिनेशसिंह चौहान, श्री. भागवत भोसले व डॉ. प्रशांत करंजीकर हे मान्यवर उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते सरस्वती व डॉ.वसंतराव नाईक यांचे प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन झाले. सुश्राव्य स्वागत गीतानंतर उद्घाटन कार्यक्रमास सुरुवात झाली. राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर कुलगुरू प्रा. डॉ.इंद्र मणी यांच्या संकल्पनेतून तर संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि), डॉ.उदय खोडके यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.



कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, शिबिरातील सात दिवसांमध्ये विद्यार्थ्यांनी त्यांचे उत्कृष्ट योगदान द्यावे. गावकऱ्यांच्या अडी-अडचणीस एकरूप होवून त्यांच्या अडचणी सोडविण्यास पुढाकार घ्यावा. आजचा युवक हा उद्याचा सशक्त नागरिक आहे, म्हणून तरुणांनी सत्यतेची कास धरावी. या उद्‌घाटन सोहळ्याचे प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी युवकांना देशाच्या प्रगती व उन्नतीसाठी तरूण कसा असावा हे विषद करताना ते म्हणाले, समाजामधील वाईट घटनांना पाहून जो बेचैन व अस्वस्थ होत नाही, त्याला तरूण म्हणता येणार नाही. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक, संघटित , सामर्थ्यशील व रचनात्मक कार्याची गरज असते. त्यांनी तरुणांना देशहितासाठी प्रेरित करतांना 'जो स्वतःसाठी जगतो तो संपलेला असतो' असे प्रखर वक्तव्य केले. विद्यार्थ्यांनी मी माझे भविष्य घडवेल असा दृष्टीकोन निर्माण करावा असे सांगून त्यांना प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन नविन मार्ग शोधण्यास प्रेरित केले. राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये चांगुलपणाचा आविष्कार विकसित होतो, असेही ते म्हणाले. भागवत भोसले यांनी महापूर गावातील ग्रामस्थांनी विशेष शिबीराचा कृषि तंत्रज्ञानाबाबत लाभ घेण्यासाठी आवाहन केले तर डॉ. रणजित चव्हाण यांनी विदयार्थ्यांना भविष्यात कृषि सप्ताह, कृषि व्याख्यान व कृषि अभंग साजरे करण्यास प्रेरित करून प्रगत युगात जगत असतानाही गावाशी नाळ कायम जोडून काम करण्यास सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. अनिलकुमार कांबळे, सूत्रसंचालन आदित्य गवळी व दीप्ती झोडगे तर आभार कविता वडजे हिने मानले. सिद्धी नलावडे व संजना वजीरे यांच्या सुश्राव्य स्वागतगीताने वातावरण भारावून गेले. या कार्यक्रमास डॉ.व्यंकट जगताप,डॉ.संतोष कांबळे, डॉ.राजेश शेळके,डॉ. नितीन तांबोळी, डॉ.दयानंद मोरे,डॉ.प्रभाकर आडसूळ,डॉ.ज्ञानेश्वर सुरडकर,डॉ.संघर्ष श्रृंगारे,डॉ. अजित पुरी,सुधीर सूर्यवंशी तसेच मोठ्या संख्येने शेतकरी,ग्रामस्थ,विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते.

## उरण महाविद्यालयाचा दीक्षांत समारंभ संपन्न...

दैनिक वादळ वार्ता
उरण/विठ्ठल ममताबादे

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाचा दीक्षांत समारंभ मोठया उत्साहात संपन्न झाला. शैक्षणिक वर्ष २०२२ - २०२३ मध्ये एम कॉम, बी कॉम, बीए व बीकॉम अकाउंटिंग अँड फायनान्स या विविध शाखेत पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आल्या. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे सुभोजीत बोस ( कार्यकारी संचालक आणि प्लांट मॅनेजर ओएनजीसी उरण प्लांट उरण) हे होते. त्यांनी हा क्षण



विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला महत्त्वाचा टप्पा असून, कष्ट आणि समर्पणाच्या बळावर विद्यार्थ्यांनी जीवन यशस्वी करावे असे सांगितले. व आयुष्यात ध्येय निश्चित करून त्या दिशेने मार्गक्रमण करावे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष नवीन राजपाल (सदस्य, महाविद्यालय विकास समिती) हे होते. आईवडिलांची स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला पाहिजे असे त्यांनी सांगितले. प्राचार्य के.ए. शामा यांनी समाधान हीच यशाची चावी असून इतरांच्या जीवनातील दुःख आपण कमी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे व अंतर्मन जागृत ठेवून जगले पाहिजे असे प्रतिपादन केले. तसेच भावी आयुष्यासाठी उपस्थित पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पदवी व पदयुत्तर अशा एकूण १२५ विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पदवी वितरित करण्यात आल्या. याप्रसंगी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विशाल पाटेकर, ज्येष्ठ प्रा. व्ही.एस इंदुलकर, आय.क्यू.ए.सी समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कुमारी हन्नत शेख यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. पराग कारुळकर यांनी दिला तर उपस्थितांचे आभार डॉ.दत्ता हिंगमिरे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

## भारत सरकारच्या नोटरी पब्लीक पदी ॲड भगवान कुंभकर्ण यांची नियुक्ती

वादळवार्ता/शिरुरकासार

अहमदनगर जिल्हा न्यायालयातील दिवाणी व फौजदारी क्षेत्रातील तज्ञ विधीज्ञ ॲउ भगवान अशोकराव कुंभकर्ण यांची विधी व न्याय मंत्रालय भारत सरकार नवी दिल्ली यांनी नुकतीच नोटरी पब्लिक पदी नियुक्ती करण्यात आली आहे ॲड कुंभकर्ण हे अनेक सामाजिक संस्था पतसंस्था बँका तसेच जिल्हा परिषदेवर कायदेशीर सल्लागार म्हणून काम पाहत आहेत

ॲड भगवान कुंभकर्ण हे गेली २४ वर्षांपासून वकिली व्यवसायात असून त्यांनी अनेक खटल्यामध्ये आपले नाव कमावले आहे

कासार समाजाचे आराध्य दैवत श्री क्षेत्र कासारे देवस्थान ता संगमनेर यावर ते प्रमुख सल्लागार म्हणून काम पाहत आहे. अनेक नामवंत खटल्यामध्ये ॲड कुंभकर्ण यांनी काम करून अनेकांना न्याय मिळवून दिला आहे नवऱ्याने बायकोकडे नांदायला जाण्याबाबतचा जगभरातील गाजलेला खटला देखील त्यांनीच काम पाहिले आहे आणि पती-पत्नी हे एक समान असतात असा



आदर्श त्यांनी समाजापुढे घालून दिला ॲड कुंभकर्ण हे गेल्या अनेक वर्षापासून गोर गरीब वंचित घटकांना न्याय मिळवून देत असून त्यांच्या या न्यायदानामध्ये अनेकांनी त्यांच्यावर विश्वास ठेवून आपली प्रकरणे त्यांच्याकडे दिले असल्याचे यावेळी सांगण्यात आले यात त्यांना मिळालेल्या या बहुमानाबद्दल दिल्ली गेट व्यापारी असोसिएशन संघटनेच्या वतीने राजेंद्र पाटील ज्येष्ठ पत्रकार अशोक झोटिंग नंदकुमार सातपुते ज्ञानेश्वर रासने . मंगेश रासने वैभव आंबोरे प्रशांत कोळपकर विशाल येंडे रवींद्र रासने शिरूर कासार येथील सिद्धेश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद महाराज शास्त्री नगरपंचायत चे प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील माझी अध्यक्ष दत्ता पाटील उपाध्यक्ष प्रकाशित दिसणार कालिका देवी संस्थानचे उपाध्यक्ष गोविंद पाटील बापूराव गाडेकर पत्रकार अशोक भांडेकर विजयकुमार गाडेकर राजेंद्र भांडेकर आसाराम गाडेकर आसाराम दगडे वैभव दगडे सुधीर भांडेकर प्रमोद दगडे प्रदीप दगडे आदींनी या निवडीचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आले आहे

## ग्रुप ग्रामपंचायत जासई यांच्या वतीने ग्रामपंचायत जासई सभागृह मध्ये फिरते लोकअदालत व कायदेविषयक शिबीर उत्साहात संपन्न.

दैनिक वादळ वार्ता
उरण/विठ्ठल ममताबादे

ग्रुप ग्रामपंचायत जासई यांच्या वतीने ग्रामपंचायत जासई सभागृह मध्ये फिरते लोकअदालत व कायदेविषयक शिबीर आयोजित करण्यात आले होते .सदर लोकअदालत व कायदेविषयक शिबीर निवृत्त जिल्हा न्यायाधीश श्रीकांत उपाध्ये यांचा उपस्थितीत पार पडले .या मध्ये जासई ग्रामपंचायत मधील नागरिकांनी सहभाग घेऊन आपल्या समस्यांचे निवारण करून घेतले. कायदेशीर बाबीवर निवृत्त जिल्हा न्यायाधीश श्रीकांत उपाध्ये यांनी मार्गदर्शन केले व कायदेशीर प्रश्न मार्गी लावले. यावेळी



निवृत्त जिल्हा न्यायाधीश श्रीकांत उपाध्ये,ग्रुप ग्रामपंचायत जासईचे सरपंच संतोष घरत,उपसरपंच श्रीमती माईताई पाटील ,उरण तालुका वकील संघटनेचे अध्यक्ष व्ही .एल .पाटील ,उपध्यक्ष किशोर ठाकूर ,माजी सभापती उरण ॲड सागर कडू ,ग्रामविकास अधिकारी भास्कर पालकर ,ग्रुप ग्रामपंचायत जासईचे सदस्य आदित्य घरत ,सुदर्शन पाटील ,प्रशांत म्हात्रे ,रामकिशोर ठाकूर ,विनायक पाटील,वीणा घरत ,सुलोचना घरत ,आश्विनि नाईक ,हर्षदा तांडेल ,श्रुष्टी म्हात्रे ,जयश्री घरत ,स्वप्नाली दामले ,प्रतिक्षा म्हात्रे व नागरिक उपस्थित होते .या कायदेविषयक शिबिराला जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे.

# होळी सणासाठी कोकणात जाण्यासाठी उरण आगारातून प्रवाशांसाठी ज्यादा बसेसची व्यवस्था.

## कोकणवासीय उत्कर्ष संस्थेच्या मागणीला यश

## जास्तीत जास्त प्रवाशी वर्गांनी सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन.

दै निक वादळ वार्ता
उरण/विठ्ठल ममताबादे

हिंदुच्या अनेक महत्वाच्या सणापैकी होळी हा एक महत्वाचा सण असून कोकण विभागात खेडोपाडी गावोगावी हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मुंबई नवी मुंबई आदी ठिकाणी काम करत असलेले नोकरदार कामगार वर्ग, चाकरमानी होळी सण मोठया उत्साहात साजरे करण्यासाठी आपल्या गावी कोकणात जात असतात.कोकणात होळी सणासाठी प्रवास करताना कोकणी माणसाला, नागरिकांना कोणत्याही अडचणी येऊ नये,कोकणी माणसाचा प्रवास सुखाचा आनंदाचा सुलभ व्हावा या दुष्टीकोनातून दरवर्षी कोकणवासीय उत्कर्ष संस्था (उरण) च्या पाठपुराव्याने उरण बस आगारातून कोकणात जाण्यासाठी व उरण मध्ये परत येण्यासाठी ज्यादा बसेस सोडल्या जातात.दरवर्षी प्रमाणे याही वर्षी कोकणवासीय उत्कर्ष संस्था (उरण)तर्फे उरण बस आगारातून कोकणात जाण्यासाठी ज्यादा बसेस सोडण्यात यावेत अशी मागणी करण्यात आली होती .सदर कोकणात बसेस सोडण्यासाठी संस्थेचे सचिव रविंद्र चव्हाण यांनी उरण बस आगार तसेच मुख्य कार्यालय असलेल्या मुंबई कार्यालय मध्येही पत्रव्यवहार केलेला होता .उरण ते रत्नागिरी, उरण ते खेड, उरण ते देवरुख, उरण ते कणकवली, उरण



ते गणपतीपुळे या मार्गावर ज्यादा बसेस सोडण्याची मागणी कोकण वासीय उत्कर्ष संस्था उरण तर्फे उरण बस आगार व्यवस्थापक अमोल दराडे यांना करण्यात आली होती . आगाराचे व्यवस्थापक अमोल दराडे यांनी या पत्रव्यवहाराला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. कोकणवासीय उत्कर्ष संस्थेच्या पाठपुराव्याला आता यश आले असून रात्री ८ वाजता उरण आगार ते गणपती पुळे या मार्गावर बस सोडण्यात येत आहे. सदर बस सेवा दिनांक २० तारखेला सुरु झाली आहे.२० मार्चला पहिली बससोडण्यात आली आहे.ही बससेवा २३ मार्च २०२३ तारखेपर्यंत सुरु आहे. कोकणात जाण्यासाठी व कोकणातुन परत उरण मध्ये येण्याचीही व्यवस्था बस द्वारे करण्यात आली आहे. तरी प्रवाशी वर्गांनी या बससेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन कोकणवासीय उत्कर्ष संस्था व उरण बस आगार तर्फे करण्यात आले आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )